दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक २६ शनिवार दि.२६ जूलैं २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# आता रोज यायचं, तोंड दाखवायचं; तलाठ्यांपासून ते महसूलच्या अधिकाऱ्यांना फेसप नोंदणी बंधनकारक

मुंबई : राज्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी आता शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, तलाठ्यांपासून (Talathi) ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच दररोज ऑफिसमध्ये हजेरी लावावी लागणार आहे. ऑफिसमध्ये फेस पवर नोंदणी झाली तरच या कर्मचाऱ्यांना यापुढे वेतन मिळणार आहे. यासंदर्भात लवकरच शासन आदेश जारी करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे (Chandrashekhar bawankule) यांनी दिली. विशेष म्हणजे महसूल कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट महिन्यातील वेतन फेस पवर (-pp) नोंदणी केलेल्यांनाच मिळणार आहे. त्यामुळे, महसूल कर्मचाऱ्यांना दररोज कार्यालयात जाऊन आपली फेस रिडींग नोंदणी करावी लागेल, अन्यथा नोंदणी न झालेल्या दिवशी उपस्थिती नसल्याची नोंद होईल.

राज्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी आता फेस प आणि जिओ–फेन्सिंग अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारने महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी फेस प आणि जिओ–फेन्सिंग प्रणाली अनिवार्य केली असल्याने कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता कार्यालयातूनच नोंदवली जाणार आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्याचा पगार (सप्टेंबरमध्ये मिळणारा) केवळ फेस पवर नोंदणी केलेल्या




कर्मचाऱ्यांनाच मिळेल. याबाबतचा स्पष्ट शासन निर्णय लवकरच काढला जाणार आहे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. महसूल मंत्र्यांकडून रायगड जिल्ह्यातील महसूलच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी हे आदेश दिले आहेत. फेस पवर नोंदणी न केल्यास गैरहजेरी तलाठी ते उपजिल्हाधिकाऱ्यापर्यंत सर्वांनाच फेस पवर नोंदणी बंधनकारक असून ज्या गावात नोकरी आहे, तिथे जात उपस्थिती लावावी लागेल. तसेच, महसूल कर्मचाऱ्यांची आता त्यांच्या कार्यालयात उपस्थिती आवश्यक असणार आहे. तर, नोंदणी न केल्यास त्या दिवशी उपस्थिती नाही, असे समजण्यात येईल. त्यामुळे, तलाठी ते उपजिल्हाधिकारीपर्यंत सर्वच महसूल कर्मचाऱ्यांना कार्यालया दररोज यावे लागणार आहे.

सरकार सर्वोच्च न्यायालयात पुरावे मांडेल

मुंबईतील २००६ सालच्या बॉम्बब्लास्टची घटना वेदना देणारी होती. त्यामुळे, सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर उच्च न्यायालयात जी मांडणी झाली त्यावर स्टे मिळाला आहे. आता, सर्वोच्च न्यायालयात आमचं सरकार पुरावे मांडेल, आमच्या पुराव्याचा न्यायालय विचार करेल असं वाटतं, अशी प्रतिक्रिया सर्वोच्च न्यायालयाने बॉम्बस्फोटप्रकरणी स्टे दिल्यानंतर दिली.

कंत्राटदारांना पैसे मिळत नाहीत हे खरंय जलजीवन मिशन अंतर्गत कंत्राट आणि युवर कंत्राटदाराच्या आत्महत्येबाबत गुलाबराव पाटील यांनी आधीच सांगितले होते की त्यांच्यावर कंत्राट नव्हतं. मात्र, कंत्राटदारांना पैसे मिळत नाही हे खरं आहे. आपल्याला जलजीवन मिशनची कामं पूर्ण करायची आहे, आणि त्या दृष्टीने सरकार आता पुढे जातं आहे, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

बच्चू कडू आता स्टंट करत आहेत –

प्रहारचे नेते बच्चू कडू यांचे समाधान झालं आहे, कडूंचा आजच एसएमएस होता की कार्यकर्त्यांची धरपकड केली आहे. काही गोष्टी महत्त्वाच्या बैठकीत सुटल्या असतील. दिव्यांगांचे पैसे आपण वाढवले आहेत, ही त्यांची महत्त्वाची मागणी होती. कर्जमाफी देखील त्यांचा दुसरा मुद्दा होता. पण, हा विषय समितीसमोर येईल. माझं ३–४ वेळा बच्चू कडूंसोबत बोलणं झालं आहे. त्यानुसार, समिती तुम्हाला बोलवेल, मात्र बच्चू कडू आता स्टंट करत आहेत, अशा शब्दात बच्चू कडू यांच्या आंदोलनवर महसूलमंत्र्यांनी भूमिका मांडली. तसेच, त्यांच्या प्रत्येक मागण्या पूर्ण करण्याचे प्रयत्न सरकार करत आहे. आता, त्यांनी आंदोलन करण्याचे ठरवले आहेत, तर त्यांनी करावे. आमच्यासोबत चर्चा ते करत आहेत, बोलणी होते असून सरकार तुमचं म्हणणं ऐकतंय आणि निर्णय करतंय. सध्या, पाऊस पाण्याचे दिवस आहेत, त्यांनी आंदोलन करू नये, असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

# सेवा संस्कार आणि सामाजिक सौहार्द जोपासणारी संस्था म्हणजे रोटरी रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष शेखर मेहता यांचे प्रतिपादन


लातूर/प्रतिनिधी :– लातूर येथील दयानंद सभागृहात रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या वर्ष २०२५–२६ साठी नवीन प्रांतपाल सुधीर व संगीता लातूरे यांचा पदग्रहण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी रोटरी इंटरनॅशनलचे पास्ट प्रेसिडेंट शेखर मेहता कोलकाता येथून विशेष उपस्थित होते.त्यांच्यासोबतच पद्मभूषण डॉक्टर अशोकराव कुकडे हे प्रमुख अतिथी म्हणून सहभागी झाले होते.

या सोहळ्यात लातूर, बीड, धाराशिव, नांदेड, जालना, संभाजीनगर, सोलापूर, सातारा, आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील विविध रोटेरियन, क्लबचे अध्यक्ष, सचिव, डिस्ट्रिक्ट ऑफिसर्स, तसेच पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक वारीची भक्ती आणि वारकरी वेशभूषेतील सहभागी रोटेरियनांनी सभागृहात भक्तिमय वातावरण तयार केले.

सभागृहात येणाऱ्या रोटेरियनांनी वारीची वेशभूषा परिधान केली होती. त्यांनी टाळांच्या नादावरती पदविन्यास करत, आपला आनंद व्यक्त केला. वारकरी भजने आणि ठेक्यांच्या तालावर त्यांनी आपला उत्साह व्यक्त केला. या वातावरणाने परिसर भक्तिमय वातावरणाने भारले गेले.

निवृत्त प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी नूतन प्रांतपाल सुधीर लातूर यांना पदभार सुपूर्द केला.

सेवा, मैत्री व सद्भाव हे मूलभूत उद्दिष्ट असलेल्या रोटरीने अनेक समाजपयोगी प्रकल्प पूर्ण केले आहेत. रोटरीमध्ये जगातील २२० पेक्षा जास्त देशात १२ लाखाहून अधिक सदस्य कार्यरत आहेत.




समाजासाठी सतत कार्यरत राहणे हा रोटरी चा मूलमंत्र असून सेवा संस्कार आणि विचार देणारी संस्था म्हणजे रोटरी होय....असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनल चे माजी अध्यक्ष शेखर मेहता यांनी केले. शेखर मेहता यांनी रोटरीच्या मोहीमांबद्दल चर्चा करत पोलिओ मुक्ती आणि साक्षरता अभियानांचा उल्लेख केला. त्यांनी समाजात मोठ्या सामाजिक उपयोगी प्रकल्प राबवण्याचे आवाहन केले.

पद्मभूषण कुकडे काकांनी रोटरी ने वारकरी थीमवर कार्यक्रम घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, वारकरी एकत्र येऊन निस्वार्थ बुद्धीने समानतेचे अनुकरण करत वारी यशस्वी करतात, तसेच रोटरी सदस्यांनीही संघटनेतून समाजाच्या हितासाठी काम करावे.*

*निवृत प्रांतपाल डॉ.सुरेश साबू यांनी आपल्या मागील वर्षाचा यशस्वी अहवाल सादर केला.पुढील वर्षासाठी रोटरीच्या दिशानिर्देशाबाबत नूतन प्रांतपाल सुधीर लातूरे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी दि रोटरी फाउंडेशन साठी उल्लेखनीय देणगी देणाऱ्या सदस्यांचा सन्मान प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आला, त्याच सोबत ज्या क्लबने मोठा निधी रोटरी फाउंडेशन साठी उभारण्याचा संकल्प केला व सदस्यता वृद्धी मध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे अशा क्लबचाही सन्मान करण्यात आला.

पूर्ण कार्यक्रम भक्तीमय वातावरणात रंगला. रोटरी कार्यकर्त्यांनी आपला उत्साह आणि भक्तीभावाने समाजासाठी काम करण्याची इच्छा व्यक्त केली. या सोहळ्याने समाजातील एकात्मता आणि सेवा भावना प्रबळ झाली.

अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे रोटरी आणि वारकरी यांच्या सहकार्याने समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश गगनाला भिडला.*

*या कार्यक्रमात रोटरीच्या डिस्ट्रीक्ट डिरेक्टरी व दिशा या मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस विठ्ठल वंदना करण्यात आली.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सद्भावना नगर ग्रीन बेल्टमध्ये वृक्षारोपण उपक्रम – पर्यावरण रक्षणाचा सकारात्मक संदेश

लातूर :– लातूर शहर महानगरपालिका आणि लायन्स क्लब सिटी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सद्भावना नगर येथील ग्रीन बेल्ट परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि हरित लातूरच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या उपक्रमात विविध मान्यवरांनी सहभाग घेतला. या वेळी लातूर महानगरपालिकेचे पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री मॅडम, क्षेत्रिय अधिकारी उ झोन चे समाधानजी सूर्यवंशी, कलीम शेख, उद्यान विभागाचे सहायक अधिकारी, लायन्स क्लब सिटीचे अध्यक्ष नागनाथजी गित्ते, जगदीश हड्डा, ईश्वरप्रसाद चांडक, पर्यावरण तज्ज्ञ सुपर्ण जगताप आणि सामाजिक कार्यकर्ते संजय राजूळे उपस्थित होते.

वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर झाडांचे अस्तित्व हे केवळ सौंदर्यासाठी नाही तर पर्यावरणाच्या संतुलनासाठी अत्यावश्यक आहे. वृक्ष म्हणजे प्राणवायूचे स्रोत, जमिनीची धूप थांबवणारे संरक्षक आणि तापमान नियंत्रणात ठेवणारे नैसर्गिक यंत्र. वाढती , जंगलतोड आणि कार्बन उत्सर्जन यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने एक झाड लावणे ही केवळ जबाबदारी नाही, तर काळाची गरज बनली आहे.

कार्यक्रमात बोलताना पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री यांनी सांगितले की, शहरात हरित पट्टा वाढवणं ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याची जबाबदारी घ्यावी. बिल्डर नागनाथजी गित्ते यांनीही पर्यावरणासाठी सतत कार्यरत राहण्याचे आवाहन करत सांगितले की, वृक्ष हेच जीवन



आहेत. आज आपण झाडे लावतो आहोत, तीच आपली भविष्यातील श्वास घेण्याची हमी ठरतील. या उपक्रमामार्फत नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयीची जाणीव वाढवणे, वृक्षसंवर्धनासाठी प्रेरित करणे आणि हरित लातूरची उभारणी करणे हा मुख्य उद्देश होता. लातूर शहराचे तापमान कमी करणे, प्रदूषण कमी करणे आणि भावी पिढीला एक सुरक्षित पर्यावरण देणे या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

# मुरुड येथील आ. रमेशआप्पा कराड यांच्या जनता दरबारला अभूतपूर्व प्रतिसाद

लातूर :– सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्या त्यांच्याशी संवाद करता यावा यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथे आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबार मध्ये वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यांचा नागरिकांनी पाढाच वाचला. या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन जे शक्य आहेत ते प्रश्न जागेवरच त्यांनी सोडविले. इतर प्रश्न संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याकडे देऊन तात्काळ कारवाई करून निकाली काढण्याच्या सूचना आमदार महोदयांनी दिल्या. तब्बल साडेपाच ते सहा तास सुरू असलेल्या या जनता दरबारास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

लातूर तालुक्यातील मौजे निवळी, चिंचोली बल्लाळनाथ, काटगाव, एकुर्गा, गादवड या जिल्हा परिषद मतदार संघासह मुरुड शहर या कार्यक्षेत्राचा जनता दरबार दि २५ जुलै शुक्रवार रोजी मुरुड येथील आशीर्वाद मंगल कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, मुरुडच्या सरपंच श्रीमती अमृताताई नाडे, उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक, मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, मुरुड शहराध्यक्ष वैभव सापसोड आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होती. यावेळी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या दहा पंधरा वर्षात गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांना आमदार साहेबांना भेटता आले नाही, आपले प्रश्न अडीअडचणी त्यांच्याकडे मांडता आल्या नाहीत. लातूर ग्रामीण मतदार संघातून निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार श्री रमेशआप्पा







कराड यांनी ज्यांचा कोणी वाली नाही त्याला न्याय देण्याची भूमिका घेऊन, जनतेच्या अडीअडचणी, प्रश्न समजून घेण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी मुरुड येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. अभूतपूर्व प्रतिसाद मिळालेल्या या जनता दरबारमध्ये उपस्थित ग्रामीण भागातील नागरिकांनी वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्या, गाऱ्हाणे मुक्तपणे मांडून निवेदनाचा पाऊसच पडला.

मुरुड शहरासह ग्रामीण भागातील विविध गावातील नागरिकांनी शेतरस्ते, घरकुल, समशानभूमी, अतिक्रमणे, शेतीतील वीज प्रश्न, कबाले, समाज मंदिर, निराधार च्या पगारी, राशन दुकानचे प्रश्न, आरोग्य विषयक तक्रारी, विविध गावातील अवैधधंदे, याबरोबरच मुरुड येथील रेल्वे स्थानक विकसित करावे, पुणे आणि मुंबई रेल्वेला थांबा द्यावा, एमआयडीसी सुरू करावी, अवजड वाहने मुरुड शहराच्या बाहेरून जावीत आदी मागण्यांचे निवेदन देऊन अनेकांनी जनता दरबार घेतल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचे मनःपूर्वक आभार मानले.

बोगस कामाची चौकशी करून दोषी अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यात येईल रस्त्यावरील अतिक्रमणे तात्काळ काढून मोकळे करावेत जनतेच्या मूलभूत प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशा महत्त्वपूर्ण सूचना करून आ. रमेशआप्पा कराड यांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले की, मराठा आरक्षणाला यापूर्वीच मी जाहीर पाठिंबा दिला असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनीच यापूर्वी आरक्षण दिले होते. निष्क्रिय महाविकास आघाडी सरकारने घालविलेले मराठा आरक्षण पुन्हा देवेंद्रजीच देऊ शकतात याची सर्वांना खात्री झाली आहे असेही त्यांनी बोलून दाखविले.

साडेपाच ते सहा तासांच्या जनता दरबारात प्रत्येक नागरिकांशी आ. रमेशआप्पा कराड यांनी संवाद साधून प्रश्न समजून घेते जे शक्य आहे त्या प्रश्नांचा तडकाफडकीने निर्णय केले तर संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने जनतेचे प्रश्न सोडवण्याच्या सूचना केल्या. नागरिकांच्या सर्वच निवेदनावर महिनाभरात कार्यवाही झालेली दिसेल अडचणीच्या विषयात निश्चितपणे योग्य तो मार्ग काढला जाईल प्रशासन गतिमान करण्यासाठी अधिकाऱ्याबरोबरच नागरिकांनीही सहकार्य करावे केवळ तक्रारी देऊन न थांबता त्याचा पाठपुरावा असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण मतदार संघात चारही ठिकाणी दर तीन महिन्याला जनता दरबार घेऊन जनतेचा न्याय देण्याची काम केले जाईल असे बोलून दाखवले.

प्रारंभी आ. रमेशअप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करुन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचलन चंद्रकांत कातळे यांनी केले. या जनता दरबार कार्यक्रमास भाजपाचे नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, अनिल भिसे, साहेबराव मुळे, बंन्सी भिसे, उद्धव काळे, श्याम वाघमारे, पद्माकर चिंचोलकर, महेश कणसे, शीतल पाटील, भैरवनाथ पिसाळ, राजकिरण साठे, लता भोसले, गोपाळ पाटील, अशोक सावंत, बाबासाहेब भिसे, काशिनाथ ढगे, धनंजय देशमुख, शुभम खोसे, विशाल कणसे, वैभव मगर, बालासाहेब कदम, सचिन सवई, प्रशांत शिंदे, सुरज सूर्यवंशी, रवी माकोडे, युवराज सव्वाशे, कल्याण पठाडे, वैजनाथ हराळे, उषा शिंदे, श्रुती सवयी या प्रमुख कार्यकर्त्यांसह लातूर तहसीलचे विविध विभागाचे नायब तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी पी जी राठोड, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता आर. एम. शेंडेकर, लघु पाटबंधारे विभागाचे अभियंता ए.बी. साळुंखे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी एम. के. तांबोळी, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे एस. जी. शेळके, जि प बांधकाम उपविभागाचे एस. जी. कुलकर्णी, पाणीपुरवठा उपविभागाचे अभियंता डी. डी. मुळे, भूमि अभिलेखचे एस. व्ही. भोसले, पशुधन विकास अधिकारी जे. पी. वाघमारे, मुरुडचे पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, तालुका आरोग्य अधिकारी आर. एच. पवार, गटशिक्षणाधिकारी सी. आर. शेख, आरटीओ अंजली पाथरे, वन परिमंडळ अधिकारी एच. एस. बिराजदार, यांच्यासह जिल्हा रेशीम उद्योग, महावितरणचे अभियंता, घरकुल आणि नरेगा विभागाचे अधिकारी, विस्तार अधिकारी, मंडल कृषी अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## भारतीय उपखंडात साधावे जागतिक शक्ती संतुलन

भारतीय उपखंडात अशांतता असण्याचे कारण म्हणजे म्यानमार, बांगला देशची ढासळलेली स्थिती, पाकिस्तानमधील अराजकता, सीमेवरून चीनच्या कुरापती, रशिया-युक्रेन युद्धाचा अप्रत्यक्ष परिणाम, पहलगाम हल्ल्यानंतर भारत -पाकिस्तानमधील ताणलेले संबंध; शिवाय सार्कची संपलेली सद्दी, शांघाय सहकार्य परिषदेतील बेबनाव पाहता प्रादेशिक भागात सौहार्द आणि सलोखा प्रस्थापित करणार्या संघटनेचा अभाव दिसून येतो. अशावेळी भारत, चीन आणि रशिया हे मातब्बर तीन देश एका संघटनेच्या (आरआयसी) माध्यमातून एकत्र येत असतील तर भारतीय उपखंडात विकासाला चालना मिळण्यासोबत जागतिक शक्ती संतुलन राखले जाईल.

काही वर्षांपूर्वी रशिया, चीन आणि भारत यांच्यात त्रिकूट करण्याचे (आरआयसी) पाहिलेले स्वप्न ही रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या दूरदर्शीपणाचे प्रतीक होते. आज पुन्हा जागतिक पटलावर त्याची चर्चा सुरू झाली आहे. शांघाय सहकार्य संघटनेची (एससीओ) अलीकडेच बैठक झालेली असताना या त्रिकुटाची संघटना स्थापन करण्याची चर्चा कूटनीती पातळीवर सुरू झाली असून ती सध्याच्या नव्या जागतिक व्यवस्थेत एक शक्तिशाली समीकरण होण्याच्या शक्यतेवर प्रकाश टाकणारी आहे. रशियानंतर आता चीनही या व्यवस्थेबाबत उत्सुक दिसत आहे. परंतु भारताने याबाबत स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. तीन देशांची शक्ती ही जागतिक व्यासपीठावर नवीन दिशा म्हणून समोर येईल की तात्पुरती लाट राहील याबाबत आताच काही म्हणता येणार नाही. रशियाने अशा प्रकारची संघटना ही रणनीतीसाठी अनिवार्य बाब असल्याचे मानले आहे. युक्रेन युद्धानंतर पश्चिम देशांनी निर्बंध लादलेले असताना आणि आर्थिक अडचणींचा सामना करणार्या रशियाला भारत आणि चीनसारख्या दमदार साथीदाराची गरज आहे.

दोन्ही देश रशियाच्या अर्थव्यवस्थेला आधार देण्याबरोबरच जागतिक पातळीवरचा एकाकीपणा दूर करण्यासाठीही फायदेशीर ठरू शकतात. 'क्वाड'सारख्या पश्चिम आघाडीला आव्हान देण्यासाठी एक पर्यायी शक्ती केंद्र निर्माण करण्याची रशियाची इच्छा आहे. रशियाचे उपपरराष्ट्रमंत्री आंद्रेई रुडेको यांनी या संघटनेसंदर्भात मॉस्कोची बांधिलकी स्पष्ट करत रशिया, भारत आणि चीन यांच्यासमवेत संवाद सुरू असल्याचे सांगितले. हे त्रिकूट युरेशियात रणनीती संतुलनाची पायाभरणी करू शकते आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था सशक्त करण्याची क्षमताही राखणारे आहे.

चीन या संघटनेबाबत सकारात्मक असून त्यांच्या वक्तव्यावरून ते कळते. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी म्हटल्यानुसार, आरआयसी सहकार्य केवळ तीन देशांसाठी महत्त्वाचे नाही तर प्रादेशिक, जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी एक सशक्त उदाहरण राहू शकते. प्रत्यक्षात त्रिकूटाच्या माध्यमातून क्वाडचा वाढता प्रभाव निष्प्रभ करण्यासाठी सुवर्णसंधी आहे. याप्रमाणे हिंद प्रशांत क्षेत्रात क्वाडचा वाढणारा दबदबा कमी करण्यास मदत करू शकते. भारतासमवेत चांगले संबंध ठेवत बेल्ट अँड रोड एनिशिटिव्ह प्रकल्प तडीस नेण्याचा चीनचा छुपा हेतू आहे आणि तो सीमावाद संपुष्टात आणू इच्छित आहे.


अलीकडेच परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचा चीन दौरा अणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यासमवेत त्याच्या भेटीने द्विपक्षीय संबंधाला उजाळा मिळाला आहे. भारतासाठी हे त्रिकूट एकप्रकारे कूटनीतीचा महासागर असून त्यात संधीच्या लाटा आणि आव्हानांच्या गटांगळ्यादेखील आहेत. भारताच्या दृष्टीने विचार केला तर ही संघटना दीर्घकालीन पातळीवर लाभाची संधी राहू शकते. जसे चीनसमवेत चांगले संबंध राहिल्यास पाकिस्तानच्या दहशतवाद पुरस्कृत धोरणाला लगाम घालता येईल आणि त्यामुळे भारताचा संरक्षण खर्च कमी राहू शकते. शिवाय सध्या चीनच्या सावलीखाली येणार्या बांगला देशने भारताकडे डोळे वटारणे सुरू केलेले असताना या संघटनेमुळे बांगला देशचे धोरण मवाळ होऊ शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारत आणि चीन यांच्यातील संबंधाला अडसर ठरणार्या सीमावादावर तोडगा काढण्याच्या प्रयत्नाला वेग येऊ शकतो.

जागतिक व्यापारासंदर्भात भारताला लाभ मिळण्याची शक्यता अधिक आहे. कारण या माध्यमातून चीनच्या भारत विरोधी व्यापार धोरणाला फूलस्टॉप मिळू शकतो. अमेरिकेची भारताप्रती आक्रमक भूमिकाही नरम पडू शकते. तरीही भारतासमोरची आव्हाने कमी नाहीत. २०२० च्या गलवान संघर्षानंतर भारत आणि चीन यांच्या संबंधात अविश्वासाची दरी वाढली आहे. अर्थात गेल्या काही महिन्यांपासून तणाव काही अंशी कमी झाला असला तरी पूर्णपणे विश्वासाचे वातावरण तयार झालेले नाही. भारताचा क्वाड, जी-७ आणि अन्य पश्चिम देशांच्या व्यासपीठावर वाढता वावर पाहता 'आरआयसी'मुळे भारताच्या सक्रियेला काही प्रमाणात आळा बसू शकतो. पण भारताचे परराष्ट्र धोरण हे बहुपक्षीय धोरणांवर अवलंबून असून कोणत्याच एका संघटनेवर आधारित भूमिका नाही आणि भारत त्यात अडकू इच्छित नाही. अशा स्थितीत आरआयसी आणि पश्चिम आघाडी यांच्यात संतुलन ठेवणे हे भारतासाठी एक कठीण कूटनीती पाऊल ठरू शकेल. भविष्यात ही त्रिकूट स्थापन होत असेल तर ते जागतिक व्यासपीठावर आव्हान उभे करू शकते आणि त्यामुळे अमेरिका आणि त्याच्या सहकार्यांसाठी एक प्रकारे अग्निपरीक्षा असेल. तसेच युरेशियात रणनीतीचे नवे केंद्र म्हणून तयार होऊ शकते. १९९० च्या दशकात रशियाचे माजी पंतप्रधान येव्हगेनी प्रिमाकोव्ह यांनी या त्रिकूट संघटनेची पायाभरणी केली आणि त्याचा उद्देश पश्चिम देशांच्या वर्चस्वाला आव्हान देणे.

# तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते चौदावे दलाई लामा.

'दलाई लामा' याचा अर्थ 'ज्ञानाचा महासागर' असा होतो. जगभरातील बौद्ध यांना आपले धर्मगुरू मानतात. आतापर्यंत १३ दलाई लामा होऊन गेले असून सध्याचे चौदावे दलाई लामा हे तेन्झिन ग्यात्सो आहेत.त्यांचा जन्म ताकत्सर, छिंगहाय,चीन मध्ये ६ जुलै १९३५ रोजी झाला. हे १४ वे नि विद्यमान दलाई लामा आहेत. तिबेटी बौद्ध मतातील गेलुग्पा पंथाच्या प्रमुख आचार्यांना दलाई लामा अश्या संज्ञेने उल्लेखले जाते. १७ नोव्हेंबर १९५० रोजी चौदाव्या दलाई लामांनी पदाची सूत्रे हाती घेतली.या दलाई लामांनी तिबेटी लोकांच्या हितरक्षणासाठी हयातभर कार्य केले असून १९८९ साली त्यांना शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.त्यांचे आई वडील शेतकरी होते. त्यांच्याकडे असलेल्या शेती व गाई,म्हशींवर ते आपला उदरनिर्वाह चालवायचे. हे कुटुंब १९३९ मध्ये दलाई लामांच्या चौथ्या वाढदिवसानंतर आपले छोटसे खेडेगाव सोडून ल्हासा येथे आले. दलाई लामांच्या निवडीसाठी असलेल्या विविध कसोट्या यशस्वीरीत्या पार केल्यावर २२ फेब्रुवारी १९४० रोजी पो ताला प्रासादात एका विधिपूर्व समारंभात तेंझिन गियात्सो चौदावे दलाई लामा म्हणून आसनस्थ झाले. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. पुढे त्यांचा धर्मविषयक सखोल अभ्यास सुरू असताना १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण केले.आणि हा प्रदेश चीनचा भाग असल्याचे घोषित केले. त्याचवेळी तिबेटच्या राजकीय सत्तेची सर्व सूत्रे दलाई लामांच्या हातात आली. या काळात तिबेटवर चिनी राजवटीचा अनियंत्रित अंमल सुरू झाला. धाक,दडपशाही,जुलूम,जबरदस्ती,छळवणूक,पिळवणूक इत्यादी अत्याचार तिबेटच्या जनतेवर चिनी राज्यकर्तांकडून व लष्कराकडून होत होते.

भगवान गौतम बुद्धाच्या शांतताप्रिय देशात हिंसाचार,लाठीमार अश्रुधूर व गोळीबार या अत्याचारांनी परिसीमा गाठली.जनतेच्या सर्वप्रकारच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादले गेले.तिबेटीय कला,संस्कृती व परंपरा यांचा ऱ्हास केला गेला.चीनच्या वाढत्या जाचामुळे व अत्याचारामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव दलाई लामांना त्याच्या कुटुंबीयांसह १९५९ मध्ये तिबेट सोडावे लागले.ते भारतात शरण आले.काही लोक नेपाळ,भूतान व इतरत्र शरण गेले.जवाहरलाल नेहरू आणि लामा यांची १९५९ मध्ये मसूरी येथे भेट झाली. आज जगभरातील विविध देशांमध्ये तिबेटीय माणसे निर्वासितांचं आयुष्य कंठत आहे. त्यातील बहुतांश मात्र भारतात आहेत. हिमाचल प्रदेशातील धरमशालात दलाई लामा वास्तव्यास आहेत. येथे त्यांनी लोकशाही मूल्यांच्या तत्त्वावर तिबेटीय निर्वासितांची संसद स्थापन केली आहे. आज ही संसद किंवा निर्वासितांचे सरकार दलाई लामांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहे.दलाई लामा तिबेट मुक्तीसाठी विविध शांतताप्रिय मार्गानी झगडत आहेत,आंदोलने करीत आहेत व आपल्यावरील अन्यायाची गाथा जगासमोर हिरिरीने मांडीत आहेत.जागतिक स्तरावर तिबेटची बाजू मांडण्यात ते पूर्णपणे यशस्वी झाले आहेत.याच कारणासाठी दलाई लामांच्या शांतताविषयक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना १९८९ मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले. देश-विदेशांत धर्म,तत्त्वज्ञान,अहिंसा,जागतिक शांतता,करुणा,मानवी हक्क इत्यादी विषयांवर ते व्याख्याने देत असतात.देश-विदेशांतील अनेक विद्यापीठांनी त्यांना सन्माननिय डॉक्टरेटची पदवी देऊन गौरविले आहे.तसेच विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांना मानचिन्हे व गौरवपत्रे दिली आहेत.आतापर्यंत त्यांनी जगभरातील ६२ देशांना भेटी दिल्या असून ७२ पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यापकी 'फ्रीडम इन एक्झाईल' व 'माय लॅन्ड न्ड माय पीपल' ही दोन त्यांची आत्मचरित्रपर पुस्तके आहेत.



१९८९ साली त्यांना शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.कारण त्यांनी जगातील मानवांच्या दुख मुक्तीसाठी दलाई लामाचे १० असे विचार,जे प्रत्येक मानवाचे जीवन सुखी करू शकतात.

१) चुका दाखवणारे मित्रच चांगले असतात.कमजोरी दाखवून ते आपल्या व्यक्तिमत्त्वातील लपलेल्या खजिन्याबाबत सांगत असतात. त्यामुळे त्यांचा सन्मान केला पाहिजे.

२) समस्या उभ्या करणाऱ्या लोकांवर चिडू नका.कारण समस्यांच्या सामना केल्यामुळेच आंतरिक शक्ती विकसित होते.सहिष्णुता आणि धैर्य दाखवण्याची संधीदेखील मिळते.

३) प्रत्येक कष्टाचे कारण अज्ञानता आहे.आनंद मिळवण्याच्या आपल्या लालसेपोटी आपण दुसऱ्यांना कष्ट पोहोचवतो.

४) करुणेचा संबंध धार्मिक विश्वासाशी नसून मानवीय आहे.आपली शांती मानसिक स्थिरतेसाठी आवश्यक आहे.करुणेशिवाय मनुष्याचे अस्तित्व शक्य नाही.

५) अडचणींनाच आपली शक्ती बनवा.त्या कितीही गंभीर आणि कष्टदायी असेनात. उत्तमातील उत्तमाची अपेक्षा कायम ठेवा.जर आपण अशा करणे सोडून दिले तर ही सर्वात मोठी चूक असेल.

६) प्रसन्नता अनेकदा बाहेरून येत नसते.ही कर्मानेच निर्माण होते.

७) नातेसंबंध गरजांवर आधारित नसतात.सर्वश्रेष्ठ नाते तेच असते ज्यामध्ये दोन्ही बाजुंनी प्रेम हे त्यांच्या गरजेपेक्षा अधिक महत्त्वाचे असते.

८) जीवनातील सर्वात मोठे लक्ष्य इतरांची मदत करणे हे आहे.जर आपल्याला कोणाचीही मदत करणे शक्य नसेल तर त्याच्यासाठी अडचणी तरी निर्माण करू नयेत.

९) चिंता ही कुठल्याही समस्येचे समाधान नाहीच.जर एखाद्या समस्येचे निराकरण करायचे असेल तर त्यासाठी चिंता करू नका.जर त्यातून मार्ग काढू शकत नसाल तर फक्त चिंता करत राहणे व्यर्थ आहे.

१०) जर आपण स्वतःवर प्रेम करू शकत नसाल तर इतरांवरही प्रेम करू शकणार नाहीत. स्वतःबद्दलच स्वतःला करुणा नसेल तर इतरांसाठीदेखील आपण करुणेचा भाव दाखवू शकत नाहीत. दलाई लामा आपल्या तीन वचनबद्धतांसाठी जगभर अविश्रांत प्रवास करतात.या तीन वचनबद्धता म्हणजे पहिली मनुष्यरूपातून आलेली करुणा,क्षमाशीलता,सहनशीलता आणि स्वयंशिस्त, दुसरी धर्मगुरु म्हणून धार्मिक सहिष्णुता आणि धार्मिक शिकवण आणि तिसरी तिबेटी नागरिक म्हणून अहिंसा आणि शांतताप्रिय तिबेटी बौद्ध संस्कृतींचं जतन.असे गुण भारतातील कोणत्याही धर्माच्या धर्मगुरू कडे दिसत नाही.म्हणूनच त्यात्या धर्मात विसंगती ठळकपणे दिसतात.शेवटी आपण मानव म्हणून काय घ्यावे हे प्रत्येकाचे स्वातंत्र्य आहे. तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते चौदावे दलाई लामा यांनाचा ९० वा वाढ दिवस देशभरात नव्हे तर जगभरात प्रेरणादायी लक्षवेधी ठरला. त्यांच्या बाबत गुगल वर विपुल प्रमाणत माहिती उपलब्ध आहे.पण काय घ्यावी आणि काय नाही हे खूप जबाबदारीचे काम आहे.मी तिबेटी भिख्खू सोबत काम करत असतांना त्यांची जिद्द ,त्याग,कष्ट करण्याची तयारी शंभर टक्के प्रेरणादायी आहे.


*********

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,
भांडूप,मुंबई.

# महिला, शेतकरी, शहरे यांच्यासाठी विधिमंडळाने काय केले?

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै २०२५ या काळात झाले, त्यात एकूण १५ बैठका पार पडल्या. विधानसभेचे दररोजचं सरासरी कामकाज ८ तास ५५ मिनिटं चाललं. एकूण कामकाज १३३ तास ४८ मिनिटे झाले. अधिवेशनासाठी एकूण ८,२७७ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते. त्यापैकी ५७९ प्रश्न स्वीकृत झाले, पैकी ९२ प्रश्नांवर सभागृहात चर्चा झाली. ८,२८१ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ५११ सूचना स्वीकृत केल्या, तर १५२ लक्षवेधींवर चर्चा झाली. अधिवेशनात विधानसभा सदस्यांची कमाल उपस्थिती ९०.४० टक्के राहिली. किमान उपस्थिती ६८.५७ टक्के राहिली. सरासरी उपस्थिती ८२.३३ टक्के होती.

या अधिवेशनात बहुचर्चित 'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२५' पारित करण्यात आले आहे. हे विधेयक शहरी नक्षलवाद आणि दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी आणण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे. यामध्ये गुन्हेगारी कृत्यांना कठोर शिक्षेची तरतूद आहे. तसेच, या कायद्यांतर्गत गुन्ह्यांची चौकशी आणि खटल्यासाठी विशेष व्यवस्था प्रस्तावित आहे. मात्र या विधेयकात अनेक बाबी संदिग्ध असल्याने हे विधेयक रद्द करण्याची मागणीही जोर धरत आहे. विरोधकांचे म्हणणे आहे की हे विधेयक संविधानाच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते, विशेषतः अभिव्यक्ती स्वातंत्र्य कलम १९ आणि वैयक्तिक स्वातंत्र्य कलम २१ यांचे हनन करणारे आहे. मात्र अधिवेशन काळात या विधेयकांवर व्यापक चर्चा होणे अपेक्षित होते, ती झाली नाही. या पावसाळी अधिवेशनात ५७,५०९.७१ कोटी रुपयांच्या, मूळ अर्थसंकल्पाच्या ८.२१ टक्के पुरवणी मागण्या मांडल्या गेल्या. यात मोठा वाटा लाडकी बहीण योजनेच्या निधीचा होता. डिसेंबर २०२४ मध्ये आणखी ३३,७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या गेल्या होत्या. विधिमंडळाच्या मागच्याच अर्थसंकल्पीय अधिवेशनातही अर्थमंत्र्यांनी ६,४८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या.



तारांकित प्रश्नांमध्ये पर्यावरणाबाबत कोकणातील लोटे औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या प्रक्रिया न करता सांडपाणी सोडण्याच्या कृत्याने होणारी हानी, ठाणे जिल्ह्यातील कारखान्यांचा ६० पेक्षा वाढलेला प्रदूषण निर्देशांक, वाडा तालुक्यातील टायर रीसायकल कंपन्यांवरील कारवाई, वसई येथील तिवराची झाडे नष्ट करून होणारे अतिक्रमण, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात बेकायदा होत असलेले माती भराव, वन विभागाकडून होणारी निकृष्ट दर्जाची कामे, पापलेट माशाच्या संवर्धनासाठीच्या उपाययोजना, मुंबई शहरात कांदळवनात डेब्रिजचा भरणा, वन्यप्राण्यांचे अनेक जिल्ह्यांत अचानक होणारे मृत्यू, कोळसा खाणींमुळे होणारे शेतपिकांचे नुकसान, प्लास्टिक बंदीचे होणारे सर्रास उल्लघंन, राज्यातील मोठ्या प्रमाणावर होणारे वायू प्रदूषण, भंडारा जिल्ह्यात वन विभागाच्या हद्दीत होणारे बेकायदा वाळू उत्खनन इत्यादी प्रश्नांना सरकारकडून सभागृहात उत्तरे देण्यात आली.

महिला, बालक आणि आरोग्य अधिवेशनात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. महिलांवरील शारीरिक आणि मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक, आणि सामाजिक त्रास यासारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. आयोगाच्या कार्यशाळा आणि कायदा साक्षरता कार्यक्रमांकडेही लक्ष वेधले गेले. विशेषतः जन्मपूर्व लिंग निदान प्रतिबंध कायदा १९९४ च्या कठोर अंमलबजावणी करण्याबाबत आश्वस्त करण्यात आले. लसीकरण, आणि कुटुंब नियोजन यावर चर्चा झाली. मविआ आमदारांनी महिला सुरक्षेसाठी ठोस कृती योजना आणि पोलिस यंत्रणेच्या सुधारणांवर चर्चेची मागणी केली, परंतु यावर व्यापक चर्चा झाली नाही. बालकांच्या कुपोषणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. बेबी केअर किट योजना आणि अंगणवाडी सेवा, शून्य ते सहा वर्षांच्या मुलांची अंगणवाडी नोंदणी, गरोदर महिलांसाठी पोषण योजना, बाल हक्क संरक्षण आयोगाचे कामकाज, कुपोषण कमी करण्यासाठी आणि बालकांच्या आरोग्यासाठी राबवल्या जाणाऱ्या योजना, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन आदी मुद्दे चर्चिले गेले. मात्र अंगणवाडी सेविकांच्या प्रशिक्षण आणि त्यांच्या मानधनातील वाढ याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर ठोस निर्णय झाले नाहीत.

लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय मंत्रालयातून ४१० कोटी रुपये आणि आदिवासी कल्याण मंत्रालयातून ३३५ कोटी रुपये वळवण्यात आले. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी ही कृती बेकायदा ठरवली. निधी वळवल्याने मनोधैर्य योजना (बलात्कार आणि ॲसिड हल्ल्याच्या पीडितांसाठीची) आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या कुटुंबांना दिली जाणारी मदत यासारख्या सामाजकल्याणाच्या इतर योजनांवर परिणाम झाला आहे.

राज्यातील सर्व सार्वजनिक आरोग्य केंद्रांच्या आस्थापनेचा आढावा घेऊन आवश्यक मनुष्यबळ आणि निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. परंतु याबाबत ठोस कृती कधी होईल ते अनिश्चित आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये पुरवल्या जाणाऱ्या औषधांच्या नमुना तपासणीत ११ कंपन्यांचे औषध बनावट असल्याचे आढळल्याने या कंपन्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले. अत्याधुनिक आरोग्य पायाभूत सुविधा महामंडळाची उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

शेती आणि शेतकरी

शेतकऱ्यांच्या नाराजीवर उपाययोजना सुचवण्यात आल्या. राज्यातील दुष्काळ आणि शेतीच्या समस्यांवर चर्चा झाली. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि पीकविम्याच्या मुद्द्यांवर सरकारला प्रश्न विचारले गेले. शेतकऱ्यांची कर्जमाफी, सोयाबीन आणि कापूस पीकांसाठी दरवाढ, आणि पीक विम्याच्या मुद्द्यांवर अपेक्षित घोषणा झाल्या नाहीत, अधिवेशनात शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली. शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाला मंजुरी देताना शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी भूसंपादनासाठी घेतल्या जात असल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे. कोल्हापूर, धाराशिव, आणि बीड जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवलेला आहे. वारंवार आंदोलने झाली आहेत मात्र अधिवेशनात यावर पुरेशी चर्चा झाली नाही. राज्यातील शेतजमिनीचे छोटे-छोटे तुकडे होऊ नयेत, जेणेकरून शेती उत्पादनात अडथळा येऊ नये, यासाठी तुकडेबंदी कायदा करण्यात आला होता. या कायद्यामुळे ठराविक प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या जमिनीची खरेदी-विक्री, हस्तांतरण किंवा विभाजनावर बंदी होती. यामुळे एक-दोन गुंठ्यांमध्ये जमीन खरेदी-विक्री करणे कायदेशीररित्या शक्य होत नव्हते. यावर मात म्हणून सरकारने तुकडे बंदी रद्द करण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांपुढे बोगस बी-बियाणे व खतांची मोठी समस्या कित्येक वर्षे आहे. चौदाव्या विधानसभेत बोगस खते व बियाण्यांबाबत कायदा करण्याचे आश्वासन वारंवार देण्यात आले होते मात्र त्याबाबत कार्यवाही झालीच नाही. या अधिवेशनात भाजपा आमदार मनोज घोरपडे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्याचप्रमाणे धाराशिवचे आमदार कैलास पाटील यांनी बोगस खते व बियाणे बाबतच्या कायद्याचा १४ व्या विधानसभेतील विसर पडलेल्या आश्वासनाचा आवर्जून उल्लेख केला. मात्र शासनाकडून याबाबतीत ठोस निर्णय न घेतल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली आहे.

हिंदी सक्ती, मराठा आरक्षण आणि अन्य मुद्दे प्राथमिक शाळांमध्ये हिंदी भाषा सक्तीच्या मुद्द्यावरून अधिवेशनातून ठोस काही हाती लागले नाही. सरकारने त्रिभाषा सूत्र मागे घेतले असले तरी, याबाबत लेखी आदेशाची प्रतीक्षा कायम आहे. हा मुद्दा मराठी भाषेच्या अस्मितेवर आघात करणारा ठरला आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा अधिवेशनात गाजला. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी आणि बलिदान दिलेल्या कुटुंबीयांना नोकरी व आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव मांडला गेला. मुंबई-पुणे आर्थिक महामार्ग, नवी मुंबई विमानतळ, मिसिंग लिंक प्रकल्प, समृद्धी महामार्ग आणि धारावी पुनर्विकास यासारख्या प्रकल्पांवर चर्चा झाली. शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाशी संबंधित भूसंपादनाच्या मुद्द्यावर चर्चा झाली. स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ सुधारणा, आणि झोपडपट्टी सुधारणा यावरही चर्चा झाली. परंतु, सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असलेल्या पाणीटंचाई, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, आणि लाडकी बहीण योजनेची अपूर्ण अंमलबजावणी यावर पुरेशी चर्चा झाली नाही.

हवामान बदलाच्या संकटाविषयी उदासीनता

जगभरातील हवामान बदलाचा फटका महाराष्ट्रालाही बसला आहे. यावर्षी, मान्सून मे महिन्यापासूनच सक्रिय झाला. दरवर्षी तापमानात विक्रमी वाढ होत आहे. रस्ते रुंदीकरण, सिमेंटचा बेसुमार वापर, शहरीकरण आणि बेकायदा जंगलतोडीमुळे कार्बन शोषण कमकुवत होऊन पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. प्लास्टिकचा बेसुमार वापर आणि भूजलाचा अतिवापर यांमुळे जल आणि माती प्रदूषण वाढले आहे. महाराष्ट्रात अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर आणि उष्माघातामुळे शेती, आरोग्य आणि अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत आहेत. २०२४ हे भारतातील सर्वात उष्ण वर्ष होते. भूजल पातळी आणि हवेची गुणवत्ता खालावली आहे. याचा गंभीर विचार करता हवामान बदलाच्या संकटावर आवश्यक चर्चेबाबत अधिवेशन उदासीन राहिले.

१५ दिवस चाललेल्या अधिवेशनाचा खर्च सुमारे २०० कोटींच्या घरात जातो. एवढ्या अफाट खर्चातून जनतेच्या हिताची किती कामे झाली? समाजातील सर्व घटकांना अधिवेशनातून न्याय मिळाला का? या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी नाहीत. ती तशी का नाहीत, याबद्दल नागरिकांनी लोकप्रतिनिधींना विचारले पाहिजे. सरकारच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित करणे लोकशाहीत गरजेचे आहे. असे प्रश्न उपस्थित करण्यासाठी अधिवेशनातील कामकाजाची माहितीही आपल्याला हवी. यासाठीच हा आढावा.

# रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी पेरू फायदेशीर? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत

फळे आपल्या शरीराला अत्यंत आवश्यक असे पोषण प्रदान करतात. परंतु तज्ज्ञांच्या मते, फळांच्या पानांमध्येही अनेक पोषक घटक असतात. पेरूच्या पानांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करणारे जास्त पोषक घटक असतात. म्हणून आम्ही रक्तातील साखर नियंत्रणासाठी काय फायदेशीर आहे याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेतला. दिल्लीतील सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंगला यांनी पेरू, पेरूपासून तयार केलेली चाट आणि पेरूच्या पानांचे रक्तातील साखरेवर होणारे परिणाम याबाबतची माहिती दिली.

पेरू पेरूचा ग्लायसेमिक इंडेक्स तुलनेने कमी असतो, ज्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी तो एक चांगला पर्याय आहे.परंतु, अर्ध्याहून अधिक पिकलेले पेरू जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, असे डॉ. सिंगला म्हणाले.

पेरू चाट कमीत कमी साखर आणि मसाल्यांचा वापर करून बनवल्यास पेरू चाट हा एक आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. पेरूला जास्त मीठ, साखर किंवा मसाले लावून खाल्ल्याने त्याचे आरोग्यदायी फायदे कमी होऊ शकतात, असे डॉ. सिंगला म्हणाले.

पेरूची पाने डॉ. सिंगला यांच्या मते, पेरूच्या पानांचा रक्तातील साखरेच्या पातळीवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. कारण- ते आतड्यांमध्ये शोषल्या जाणाऱ्या



ग्लुकोजला रोखू शकतात आणि इन्सुलिन उत्पादनास उत्तेजन देऊ शकतात. तुम्ही पेरूच्या पानांचे सेवन चहा किंवा अर्काच्या स्वरूपात करू शकता.

रक्तातील साखर कमी करते प्राणी आणि मानवी अभ्यासात पेरूची पाने रक्तातील साखरेची पातळी कमी करतात, असे आढळून आले आहे.

इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते : पेरूची पाने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे टाईप २ मधुमेह होण्याचा धोका कमी होतो.

अँटिऑक्सिडंट गुणधर्म : पेरूची पाने अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करतात.

सावधगिरी बाळगा तुमच्या आहारात कोणतेही महत्त्वाचे बदल करण्यापूर्वी तुमच्या आरोग्य सेवा प्रदात्याचा सल्ला घ्या; विशेषतः जर तुम्हाला मधुमेह किंवा इतर आरोग्य समस्या असतील.

पेरूच्या सेवनामुळे तुमच्या रक्तशर्करेच्या पातळीवर प्रतिकूल परिणाम होत नाही ना याची खात्री करण्यासाठी तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासा.

डॉ. सिंगला म्हणाले की, रक्तातील साखरेचे नियंत्रण चांगले राहण्यासाठी, तुमच्या आहारात पेरूच्या पानांचा समावेश करण्याचा विचार करा. पेरूची पाने रक्तातील साखर नियंत्रणासाठी अधिक प्रभावी पर्याय ठरू शकतात. कारण- त्यात ग्लुकोजचे शोषण रोखण्याची आणि इन्सुलिन उत्पादन उत्तेजित करण्याची क्षमता असते. एकंदरीत पेरू फळ आणि पेरू चाटदेखील संतुलित आहाराचा भाग ठरू शकते हे लक्षात घ्या.

## फणसासह कधीही करू नका 'या' पदार्थांचे सेवन; नाहीतर उद्भवतील अनेक समस्या

फणस फक्त खाण्यासाठीच चविष्ट नाही, तर आरोग्यासाठीही तो खूप फायदेशीर आहे. त्यात फायबर, जीवनसत्त्वे व अँटीऑक्सिडंट्ससह अनेक प्रकारचे पोषक घटक असतात, जे शरीरासाठी खूप चांगले असतात. त्यामुळे त्याच्या सेवनाने रोगप्रतिकार शक्तीदेखील वाढते. परंतु तुम्हाला माहीत आहे का की, काही पदार्थ फणसाबरोबर खाऊ नयेत? असे काही पदार्थ आहेत की, त्यासह फणस खाल्ल्याने तुमच्या आरोग्याचे नुकसान होऊ शकते.



फणसाबरोबर 'हे' पदार्थ खाणे टाळा

फणसासह मासे खाणे

फणस आणि मासे एकत्र खाणे खूप हानिकारक असू शकते. ते एकत्र खाल्ल्यामुळे त्वचेच्या समस्या, ॲलर्जी व पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. खरं तर मासे आणि फणस हे दोन्ही पदार्थ उष्ण आहेत. अशा परिस्थितीत त्यांचे एकत्र सेवन केल्याने शरीरात उष्णता वाढू शकते आणि पचनावर खूप वाईट परिणाम होऊ शकतो. या दोन्हींचे सेवन केल्याने ॲसिडिटी, गॅस किंवा पोटदुखीसारख्या समस्यादेखील उद्भवू शकतात.

फणसासह दुग्धजन्य पदार्थांचे सेवन

फणसासह दुग्धजन्य पदार्थांचे सेवन केल्याने गॅस, अपचन व ॲसिडीटीची समस्या वाढू शकते. उन्हाळ्यात हे दोन पदार्थ एकत्र खाणे खूप हानिकारक ठरू शकते. त्याव्यतिरिक्त त्वचेच्याही अनेक प्रकारच्या समस्या वाढू शकतात.

दारूचे सेवन

फणस खाल्ल्यानंतर वाइन किंवा बीअरसारखी अल्कोहोलिक पेये पिऊ नयेत. त्याचा प्रकृतीवर वाईट परिणाम होतो, ज्यामुळे पचनक्रियेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्याशिवाय शरीरात विषारी पदार्थ जमा होण्याची शक्यता वाढते.

# दुपारच्या जेवणात काय बनवावं सुचत नाही? मग सोप्या पद्धतीमध्ये बनवा ज्वारीचे पिठाचे चविष्ट थालीपीठ

रोजच्या आहारात नेहमीच सात्विक आणि हेल्दी पदार्थांचे सेवन करावे. दुपारच्या जेवणात भात, डाळ, चपाती, भाजी इत्यादी पदार्थ खाल्ले जातात. डाळ भात पचनासाठी अतिशय हलका पदार्थ आहे.तसेच दुपारच्या जेवणात नेहमीच पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला ज्वारीच्या पिठाचे थालीपीठ बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. थंडीच्या दिवसांमध्ये आहारात वेगवेगळ्या कडधान्यांपासून बनवलेल्या पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे.ज्वारी आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. ज्वारीमध्ये फायबर, प्रथिने, लोह, आणि इतर आवश्यक पोषक तत्वे भरपूर प्रमाणात आढळून येतात. ज्यामुळे सकाळच्या नाश्त्यात किंवा इतर वेळी तुम्ही ज्वारीच्या पिठापासून बनवलेले थालीपीठ खाऊ शकता. मधुमेह असलेल्या रुग्णांनी आहारात कोणत्याही गोड किंवा तांदळाच्या पदार्थांचे सेवन न करता ज्वारी किंवा नाचणीच्या पिठाची भाकरी खावी. चला तर जाणून घेऊया ज्वारीचे थालीपीठ बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: ज्वारीचे पीठ कांदा हिरवी मिरची पाणी जिऱ्याची पावडर गाजर दही तेल आलं लसूण पेस्ट हळद लाल तिखट जिऱ्याची पावडर दूध न आटवता १० मिनिटांमध्ये झटपट बनवा घट्ट-रवाळ रबडी! पुरीसोबत लागेल सुंदर चव कृती: ज्वारीच्या पिठाचे थालीपीठ बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या बाऊलमध्ये ज्वारीचे पीठ घेऊन त्यात चवीनुसार मीठ, आलं लसूण पेस्ट आणि बारीक चिरलेला कांदा घालून मिक्स करा. नंतर त्यात किसून घेतलेला गाजर,लाल तिखट, जिऱ्याची पावडर, हळद, दही आणि थोडेसे पांढरे तीळ घालून मिक्स करून



घ्या. सर्व पदार्थ व्यवस्थित मिक्स झाल्यानंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून मिक्स करून घ्या. तयार केलेले थालीपीठाचे मिश्रण जास्त पातळ करू नये. तवा गरम करून त्यावर सगळीकडे तेल पसरवून घ्या. त्यानंतर ओल्या केलेल्या कॉटनच्या कपड्यावर थालीपिठाचा गोळा घेऊन गोलाकार थालीपीठ थापून घ्या. तव्यावर थालीपीठ टाकून सगळीकडे तेल सोडून दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले ज्वारीच्या पिठाचे खमंग थालीपीठ.

# हॉटेल,रेस्टॉरेंटवर दारु विक्रीचा निर्णय रद्द महाराष्ट्रात दारु बंदीचा कायदा मागणीसाठी विधवा महिलांचे आक्रोश आंदोलन.




मुंबई: - दारु मुक्ती आंदोलनाचे वतीने,मुंबईचे आझाद मैदानावर अनुक्रमे १५,१६,व १७ जुलै रोजी देवेंद्र फडणीसाचे मंत्री मंडळाने ३ जून २०२५ रोजी राज्यातील हॉटेल व रेस्टारेंटमधे विदेशी मद्यविक्रीचा निर्णय घेतला तो रद्द करावा,शिव छत्रपति दैवत असणाग्रा महाराष्ट्रात संपूर्ण दारु बंदीचा कायदा करावा या प्रमुख मागणीसह अन्य मागण्याकडे सरकारचे लक्ष्य वेधण्याकरीता,महाराष्ट्र सरकारचे मुक्त दारु धोरणामुळे, दारु व्यसनात महिलांचे नवरे मारलेत अशा विधवा महिलासह राज्यातील दारुग्रस्त,त्रस्त शेकडो स्त्री,पुरुषांचे धरणे संपन्न झाले,वरील मागण्यासह राज्यातील सर्व अवैध दारु विक्री तातडीने बंद करावी,दारुचे व्यसनात मृत्यू झालेल्यांचे वारसांना किमान १० लाख भरपाई मिळावी,त्या कुटुंबाचे सर्वां गिण पुनर्वसन व्हावे,सरकारने घोषित केलेली राज्यातील पंढरपूर,शेगांव,शिर्डी,देहू,आळंदी,तुळजापूर,गुरुकुंज (मोझरी) आदि सर्व तिर्थक्षेत्र दारु मुक्त करावीत,दारु बंदीचे काम करणारया कार्यकर्त्यांना दरमहा १० हजार मानधन व ५ हजार प्रवास खर्च मिळावा या महत्वपूर्ण मागण्याकरीता हे धरणे आयोजित केले,व निवेदने मा.देवेद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार,श्री.पंकज भोयर,गृहराज्य मंत्री यांचेकडे पाठवण्यात आलीत व दारु मुक्ती आंदोलनाचे प्रतिनिधी मंडळा सोबत चर्चेसाठी सतत ३ दिवस वेळ मागण्यात आली, परंतु लोकशाहीचे नाटक करणाग्रा फडणवि सांचे एकाही मंत्र्यास वेळ मिळाला नाही. शेवटी अधिवेशनाचे अखेरचे दिवशी १८जुलै रोजी आझाद मैदाना वरुन दारु मुक्ती आंदोलनाचे प्रमुख संयोजक भाई रजनीकांत यांनी, दारु कारखानदार दारु विक्रीचा व्यापार करणारे,व लाखो महिलांचे कुंकू पुसणारे,त्यांना वैधव्यात ढकलणाऱ्या फडणविस सरकारचे मंत्र्यांकडून फक्त रस्त्यावरच जाहिर जबाब घेण्याचे घोषित केले व मुंबईचे आझाद मैदानावर,मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून लक्ष्यवेधी धरण्याचे उपक्रमाचा समारोप केला.या धरणे आंदोलनात दारु मुक्ती आंदोलनाचे राज्य संघटक,जेष्ठ पत्रकार सर्वश्री प्रभाकर नारकर,श्रीमती सिसीली कार्डोझो,संघटिका, कोकण विभाग,दारु मुक्ती आंदोलन,भाई प्रदिप अंभोरे,अध्यक्ष,भूमिमुक्ती मोर्चा महाराष्ट्र राज्य,पुनम कनौजिया,एन.ए.पी.एम,पुजा पंडीत,जनता श्रमिक मोर्चा, मालाड,अविनाश पाटील,राज्य समन्वयक,महाराष्ट्र राज्य,व्यसनमुक्ती मंच, विनोद भोसले,सचिव,अंशकालीन महिला कर्मचारी संघ,नाशिक,दारु मुक्ती आंदोलनचे संघटक,कामगार नेते सागर तायडे,ठाणे,जगदीश इंगळे,संघटक,रमेश पवार,वाशिम,किरण ठाणगे,अहिल्या नगर,सिध्दांत गवळी, पैठण,दारु मुक्ती आंदोलनचे लक्ष्यवेधी धरणकर्ते श्री.रमेश गाडेकर,संघटक,बुलढाणा जिल्हा,भिमराव खरात,उषाताई सपकाळ, उषाताई जाधव,आशाबाई वाघ,शांता साबळे, आसराबाई पारवे,नंदाताई तायडे, आकाश सावंत,समाधान गिरी,शांताराम सोनोने, जिल्हा बुलढाणा,आदि शेकडो स्त्री-पुरुषांचा सहभाग ३ दिवसाचे धरणे उपक्रमात होता.

# महाराष्ट्र मंत्रिमंडळात होणार फेरबदल, ८ विकेट पडणार... 'हे' मंत्री हिटलिस्टवर!



महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळात लवकरच मोठे फेरबदल करण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. महायुती सरकारमधील ८ वादग्रस्त आणि काही दिग्गज मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखवून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटातील काही मंत्र्यांवर ही गंडांतर येण्याची शक्यता आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि जनमानसातील प्रतिमेसाठी हा बदल महत्त्वाचा मानला जात आहे.या संभाव्य बदलांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता असून, याचा आगामी निवडणुकांवर काय परिणाम होतो हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. दैनिक 'सामना'मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले असले तरी, सरकार स्थापन झाल्यानंतर काही मंत्री आणि आमदारांच्या वादग्रस्त भूमिका आणि वर्तनामुळे जनतेमध्ये चुकीचा संदेश जात असल्याचे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात काही मंत्र्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचेही समोर आले आहे. या सर्व बाबींचा विचार करून राज्य मंत्रिमंडळात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, इतर पक्षांतील काही दिग्गजांना भाजपमध्ये प्रवेश देऊन त्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाण्याचीही चर्चा आहे. हे आठ मंत्री हिटलिस्टवर भाजप: भाजपकडून मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेल्या मत्स्यविकास मंत्री नितेश राणे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची वादग्रस्त पार्श्वभूमी पाहता त्यांच्या मंत्रिपदाला धोका निर्माण झाला आहे. भाजपचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे गिरीश महाजन यांना पक्षाच्या गरजेपोटी मंत्रिमंडळाबाहेर थांबावे लागण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे गट: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या तीन ते चार मंत्र्यांना मंत्रिमंडळातून नारळ दिला जाण्याची शक्यता आहे. यामध्ये वादग्रस्त ठरलेले सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, रोहयो मंत्री भरत गोगावले, शिक्षणमंत्री दादा भुसे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा समावेश असू शकतो. अजित पवार गट: संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडे यांनी आधीच राजीनामा दिल्यानंतर आता सातत्याने वादग्रस्त ठरलेल्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदावर टांगती तलवार आहे. नरहरी झिरवळ यांनाही मंत्रिपद गमवावे लागण्याची शक्यता आहे. राहुल नार्वेकर यांची मंत्रिमंडळात वर्णी लागणार? दुसरीकडे, या फेरबदलात विधानसभा अध्यक्षपदासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाची चर्चा आहे. तर राहुल नार्वेकर यांची मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता आहे. सध्या सुधीर मुनगंटीवार नाराज असल्याचे बोलले जात आहे. त्यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांना विधानसभा अध्यक्षपद दिले जाण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. कोकाटेंचं कृषीमंत्रीपद जाणार? अजित पवारांचा प्लॅन इ तयार कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंकडून कृषी खाते काढून घेतले जाणार असल्याची माहिती समजते. कोकाटेंचं खातं बदललं जाणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यासंदर्भात शुक्रवारी (२५ जुलै) निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र कोकाटे मंत्रिमंडळातच राहाणार असून केवल खातेबदल केला जाईल, अशी शक्यताही व्यक्त केली जात आहे.

# आवादा कंपनीसह सागर साबळे, संदीप कात्रे यांच्यासह त्यांच्या सहकार्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा-बालासाहेब भोसले

केज तहसील चे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतः उपोषण स्थळी हजर होऊन मयत महिलेच्या नातेवाईकांसोबत तहसीलदार राकेश गिड्डे यांनी चर्चा करून त्यांना विनंती केली की सदरील घटनेची उपजिल्हाधिकारी वजाळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करून बुधवारी तहसील कार्यालयात आपले मनने लेखी व तोंडी स्वरूपात ऐकुन जिल्हाधिकारी साहेब यावर निर्णय घेऊन संबंधितवर कारवाई करतील असे आश्वासन देऊन झालेल्या मृत महिलेचा अंत्यविधी करण्यासाठी प्रेत ताब्यात घ्यावे अशी विनंती करण्यात आली

आवादा कंपनीच्या मनमानी कारभाराच्या विरुद्ध भोसले कुटुंबासह त्यांच्या शेतजमिनीच्या शेजारील शेतकरी व महिला केज तहसील कार्यालयाच्या समोर मागील दोन दिवसापासून आमरण उपोषणास बसले होते. सदर कुटुंब व इतर शेतकरी उपोषणास बसले असता मयत महिलेने सदर कंपनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या धमक्याचा मनस्ताप करून सदर महिलेचा मृत्यू झाला आहे. त्या महिलेच्या मृत्यूवास संबंधित कंपनी व त्यांचे सहकारी जबाबदार आहेत असा मध्यमाशी बोलताना नातेवाईकांनी आरोप केलेला आहे.

केज/प्रतिनिधी आवादा कंपनीसह सागर साबळे, संदीप कात्रे यांच्यासह यांच्या सहकार्यावर सदस मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी मयत महिलेच्या नातेवाईकांनी केज तहसीलदार पोलीस निरीक्षक यांच्याकडे करत होते. मृत महिलेचे नातेवाईक बालासाहेब संतोष भोसले यांनी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे नातेवाईकांना पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी सदर प्रकरणी तात्काळ चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेऊन अंतिमसंस्कार करण्यासाठी नातेवाईक घेऊन गेले. आवादा कंपनीने आमच्या शेतजमिनीत १३ केव्ही ट्रान्स मशीन लाईनचे अनाधिकृत काम चालू करण्यात आले आहे. सदर कामास आमचा विरोध असून आम्ही या संदर्भात तहसील कार्यालय केज येथे गेल्या दोन दिवसापासून शांततेच्या मार्गाने उपोषण सुरू केले आहे. मात्र संबंधित प्रशासनाकडून आमच्या उपोषणाची कुठलीही दखल घेण्यात आलेली नाही. दरम्यान आवादा कंपनीचे प्रतिनिधी सागर साबळे व संदीप कात्रे आणि त्यांचे सहकारी आमच्या शेतात येऊन अरेरावीची भाषा करत होते, सदर लाईन तुमच्या शेतातूनच जाईल आडवे आला तर परिणाम भोगावे लागतील अशा स्वरूपाच्या धमक्या देत होते. या मानसिक तणावामुळे सुभाबाई गोपाळ भोसले यांचा मृत्यू झाला आहे. या मृत्यूला कारणीभूत आवादा कंपनी, सागर साबळे संदीप कात्रे व त्यांचे सहकारी याला सर्वस्वी जबाबदार असून आवादा कंपनी, सागर साबळे,संदीप कात्रे आणि त्याचे सहकारी व प्रशासनातील अधिकारी हे आहेत. सदर घटना ही अतिशय गंभीर असून भविष्यात अशी घटना परत होऊ नये यामुळे सदर घटने प्रकरणी संबंधित व्यक्तीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी लेखी निवेदनाद्वारे बालासाहेब भोसले यांनी पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांच्याकडे मागणी केली आहे.



## अवादा कंपनीचा धसका घेऊन वृद्ध महिलेचा उपोषण स्थळी मृत्यू

केज/प्रतिनिधी आवादा कंपनीच्या मनमानी कारभाराला कंटाळून भोसले कुटुंबीयासह त्यांच्या शेजारील शेतजमिनी असलेल्या शेतकरी व महिलांनी केज तहसील समोर गुरुवार पासून उपोषण सुरू केले होते. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होनार नाही तोपर्यंत या ठिकाणावरून आम्ही हालणार नाही अशी भोसले कुटुंबीयांसह इतर शेतकऱ्यांची मागणी होती. परंतु शुक्रवारी शुभाबाई भोसले यांची प्रकृती अचानक बिघडली व त्यांना केज येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून १२-३० वा. सुमारास त्यांचा मृत्यू झाला आहे असे घोषित केले.

या मृत्यूला आवादा कंपनी जबाबदार आहे कारण त्यांनी केलेला मनमानी कारभार व सतत पोलीस प्रशासनातील लोक आरेराविची भाषा व इतर गुंड प्रवर्तिच्या लोकांकडून आमच्यावर सतत अन्याय होत होता याचा धसका घेऊन सुभाबाई भोसले यांनी तहसील कार्यालयाच्या समोर उपोषण चालू असताना आपली जीवन यात्रा संपवली यावरून असे दिसून येते की, प्रशासन व आवादा कंपनी यांच्यामध्ये किती मिलीभगत आहे की,काय असे किती जीव गेल्यास प्रशासनातील अधिकारी ठोस निर्णय घेतील. असे उपस्थित असलेल्या नागरिकांतून बोलले जात होते. सदर प्रकरणी महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन काय कारवाई करणार आहे ते पाहणे आता गरजेचे आहे. याकडे केज तालुक्यासह संबंध राज्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. सदर उपोषण हे आवादा कंपनीच्या त्रासाला कंटाळून चालू आहे ज्या ठिकाणी लाईटचे पोलचा सर्वे झाला आहे त्या ठिकाणी न होता आमच्या राहतात त्या घरावरुन जात असल्याने यांच्यापासून आम्हाला व आमच्या परिवाराला धोका निर्माण होऊ शकतो या मागणीसाठी तहसील कार्यालया समोर उपोषण चालू असताना सुभाबाई गोपाळ भोसले यांची प्रकृती खालावली व एका खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी नेहले असताना सुभाबाई गोपाळ भोसले यांचा मृत्यू झाला असल्याने आवादा कंपनीच्या विरोधात ३०२ चा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सर्व पक्षाचे पदाधिकारी व भिमसैनिकांसह नातेवाईक मोठ्या संख्येने तहसील कार्यालयात व परिसरात मध्ये ठिय्या मांडून बसले होते.

# शासनाचा स्थगन आदेश असतानाही पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील रुग्णालयांची कामे सुरू......

## मराठवाड्यातील लातूर जिल्हा रुग्णालय अजूनही लालफितीतच. हा अन्याय का?

लातूर: – एकीकडे शासनाने आरोग्य विभागातील बांधकामांना शिस्त लावण्याच्या नावाखाली राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या विविध आरोग्य विभागाच्या बांधकामांना स्थगिती आदेश दिला आहे. मात्र विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघट येथील ४०० खाटाच्या रुग्णालयाचे टेंडर शासनानेच काढले आहे. मात्र मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयासाठी शासन का उदासिन आहे? असा संतप्त सवाल लातूरकरांमधून विचारला जात आहे. तर गेल्या १६ वर्षांपासून आरोग्य सेवेपासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्य सुविधेचा हा अनुशेष शासन कधी भरून काढणार याकडे मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने २९ मे २०२५ रोजी शासन निर्णय पारित करण्यात आला होता की, मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेमध्ये राज्यातील आरोग्य सेवेच्या पायाभूत सुविधांच्या संदर्भात शिस्त आणणे आणि नियोजित पध्दतीची कामे हाती घेण्याचे निर्देश दिले. या अनुसरून सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत बांधकामांना शिस्तबध्द कार्यक्रम हाती घेण्याचे शासनाने ठरवले. या माध्यमातून ज्या आरोग्य संस्थांचे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व इतर नवीन रुग्णालय, श्रेणीवर्धित रुग्णालय यांच्या बांधकामाबाबत त्याचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत अशी सर्व बांधकामे पूर्ण करणे आवश्यक आहे. ही कामे पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही नवीन आरोग्य संस्थांची बांधकामे मंजूर किंवा सुरू करता येणार नाही. ज्या आरोग्य संस्थांची बांधकामे मंजूर आहेत, मात्र त्यांचे बांधकाम हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास सुरू झालेले नाही किंवा ज्यांच्या बांधकामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत, त्यांच्या निविदा काढल्या असल्या तरीही अशा सर्व आरोग्य संस्थांच्या कामाच्या प्रशासकीय मान्यता सद्यस्थितीत रद्द करण्यात येत आहेत असे या आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. हा अध्यादेश मे महिन्यात काढण्यात आला असल्यामुळे मे महिन्याच्या नंतर राज्यातील सर्वच जिल्ह्यातील अशा प्रकारच्या कामांना स्थगिती मिळाली होती. शासनाच्या या लालफितीच्या धोरणामुळे लातूर जिल्हा रुग्णालयाला हक्काची जागा पैसे भरून आरोग्य विभागाच्या ताब्यात आल्याच्यानंतर हे बहुप्रतिक्षित लातूर जिल्हा रुग्णालय शासनाच्या या धोरणामुळे लालफितीत अडकले आहे. परंतु, राज्यशासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने शासनाने काढलेल्या या अध्यादेशाला केराची टोपली दाखवत विद्यमान शासनाच्या वतीने आपल्याच आदेशाची पायमल्ली करत दिनांक ३ जुलै २०२५ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील ४०० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाकरिता निविदा काढण्यात आलेली आहे. एकीकडे शासन आरोग्य विभागातील बांधकामांना शिस्त लावण्याची भाषा करीत राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या विविध आरोग्य विभागाच्या बांधकामांना स्थगिती आदेशाला लालफितीत अडकावून चाप लावत आहे. परंतु लातूर जिल्हा हा राज्यातील एकमेव असा जिल्हा आहे की ज्या जिल्ह्यामध्ये गेल्या १६ वर्षापासून जिल्हा रुग्णालयाची मंजुरी मिळाली आहे. त्यासाठीच्या बांधकामाच्या निधीची देखील तरतूद करण्यात आलेली आहे. लातूर मध्ये नवीन जिल्हा रुग्णालय बांधण्यासाठी जागेचा प्रश्न प्रलंबित होता. याबाबत 'माझं लातूर' परिवाराच्या वतीने सलग दोन वर्षे आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करीत लातूर शहरातील जिल्हा रुग्णालयासाठी नांदेड रोडवरील कृषी महाविद्यालयाची दहा एकर जागा शासनाने आरोग्य विभागाच्या ताब्यात द्यावी असे शासन आदेश दिले. मात्र त्याचे पैसे न भरल्याने हा प्रश्न प्रलंबित होता. यावर समन्वय




साधून लातूर जिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी राज्यशासनाने जागा हस्तांतरण करण्यासाठी लागणारा ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपयांचा मोबदला कृषी विभागाला देऊन ही जागा आरोग्य विभागाच्या ताब्यात दिली. यामुळे लातूरला जिल्हा रुग्णालय बांधण्याचा प्रश्न मार्गी लागला व बहुप्रतिक्षीत आस्थापनेचे भूमीपुजन लवकरच होईल अशी अपेक्षा लातूरकर करीत होते. मात्र मे महिन्यात काढलेल्या शासन आदेशामुळे लातूरकरांच्या जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचा प्रश्न पुन्हा रखडला गेला आहे. राज्याच्या ३५ जिल्ह्यामध्ये जनतेच्या मोफत आरोग्य सुविधेसाठी जिल्हा रुग्णालय कार्यरत आहेत. केवळ लातूर हा एकमेव जिल्हा 'जिल्हा रुग्णालय' नसल्याने गेल्या एक तपापासून शासनाच्या विविध आरोग्य सुविधांपासून वंचित राहिला आहे. शासन विशेष बाब म्हणून लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण करेल, अशी अपेक्षा लातूरकर करीत असतानाच या शासनाच्या वतीने स्वतःच्याच अध्यादेशाची पायमल्ली करीत विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघट येथील ४०० खाटाच्या रुग्णालयाचे टेंडर शासनाने काढले आहे. मग मराठवाड्यातील गेल्या १६ वर्षापासून प्रतिक्षेत असणार्या विविध आंदोलनाने जिल्हा रुग्णालयासाठी जागा प्राप्त करणार्या लातूर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासाठी शासन का उदासिन आहे? लातूरकरांवर आणि विशेषतः मराठवाड्यावर हा अन्याय का? असा संतप्त प्रश्न लातूरकरांच्या वतीने या सरकारला विचारण्यात येत आहे. राज्यातील पश्चिम महाराष्ट्रामध्ये विशेषतः बारामतीत जवळपास २ हजार कोटीच्या विविध शासकीय इमारतींच्या कामांना या सरकारच्या काळात सुरूवात झाली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे नुकतीच पुणे जिल्ह्यात जनावरांसाठी पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अडीचशे कोटीच्या कामाचे टेंडर जुलै महिन्यामध्ये काढण्यात आले आहे तर दुसरीकडे विदर्भातील विविध कामांना हजारो कोटींचा निधी दिला जात आहे. मग मराठवाड्यावरतीच असा अन्याय का? असाही प्रश्न माझं लातूर परिवाराच्या वतीने उपस्थित करण्यात येत आहे. लातूरकरांच्या हक्काचे, लातूरकरांच्या गरजेचे आणि नैसर्गिक न्यायानुसार लातूरला जिल्हा रुग्णालयाचे काम तात्काळ सुरू होण्यासाठी शासनाने पावले उचलावीत अन्यथा यासाठीचे आंदोलन तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती 'माझं लातूर' च्या वतीने देण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जिल्ह्यातील एकाही सन्माननीय लोकप्रतिनिधीने यावर चकार शब्द काढला नाही याबद्दलही माझं लातूर परिवाराने नाराजी व्यक्त केली आहे. प्रलंबित जिल्हा रूग्णालय इमारतीचे भूमिपजन करून त्वरीत बांधकामास सुरुवात करावी असे पत्र देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझं लातूर परिवाराने दिले आहे.

## जीवन का हर मार्ग सफलता की और ही जाता है- समाजभूषण उत्तम तरकसे




उत्तर प्रदेश राज्य:-जनपद कासगंज जिल्हा (उत्तर प्रदेश राज्य) येथील वन स्टॉप सेंटर महिला व बालसुधारग्रह जनपथ कासगंज (उत्तर प्रदेश) व कासगंज कोतवाली पोलीस ठाणे (उत्तर प्रदेश ) च्या वतीने महिला येऊन बच्चो के मानसिक सोच मे सुधार लाने के लिए मानसिक सुधार की ओर *एक कदम आगे

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोकर (महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत महाराष्ट्र राज्य) यांना निमंत्रित करण्यात आले होते ते निमंत्रित विशेष अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून सदर महिला बाल सुधारग्रहाची पाहणी करत सदर सुधारग्रहाली काही सुधारणा करण्याच्या सूचना देत तेथील उपस्थित महिला व बाल गुन्हेगारांना त्यांचे मानसिक, शारीरिक, बौद्धिक, धैर्य वाढवण्याच्या दृष्टीने व ते गुन्हेगारी पासून त्यांना प्रवर्त करण्याच्या दृष्टीने मा उत्तम तरकसे यांनी आपले विचार मांडताना आत्मविश्वास, धैर्य. दानशीता साहस और सहनशक्ती...! ये हमारे भीतर छिपी दिव्य शक्तीयॉ है !

यदि उन्हे जागृत रखा जाए तो जीवन का हर मार्ग सफलता की और ही जात आहे...!

असे मोलाचे मार्गदर्शन हिंदी भाषेमध्ये केले सदर कार्यक्रमास वन स्टॉप सेंटर कासगंज जिल्हा अधीक्षका प्रियंका मॅडम व कासगंज कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी चंचल कुमार व त्यांचा स्टाफ तसेच बाल सुधार गृहाच्या मॅनेजर मिसेस कविता व व्यवस्थापिका मिसेस शारदा व वन स्टॉप सेंटर मध्ये उपस्थित महिला व बाल गुन्हेगार असे उपस्थित होते कार्यक्रमाच्या शेवटी बाल सुधारग्रहाच्या कासगंज जिल्हा अध्यक्ष मिसेस प्रियंका मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे व विशेष अतिथी उत्तम तरकसे यांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

## सहाय्यक निबंधक कार्यालयाला माहितीचा अधिकार कायद्याविषयी अनास्था!

लातूर :- लातूर येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकार्यामध्ये प्रचंड अनास्था आणि लोकसेवकाची भावना आपल्यात नसल्याचे आणि अस्पष्ट,अर्धवट,पानांवर नंबर नसलेली, माहिती मिळाल्याने दाखवून संतप्त अर्जदाराने सहाय्यक निबंधक डी.बी.दुधाटे यांच्याकडे सोमवारी प्रथम अपिल केले आहे.

गेली बारा वर्षांपासून सहकार क्षेत्रात सतत अर्ज-तक्रारींच्या घेर्यात असलेल्या लातूरच्या स्वातंत्र्य सैनिक संग्राम नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेशी निगडीत पत्रव्यवहारासंबंधी पत्रकार-कार्यकर्ते बाळकृष्ण होळीकर यांनी सहाय्यक निबंधक कार्यालयात दि.१८ जून २०२५ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत स्वातंत्र्य संग्राम सैनिक नगर सहकारी गृहनिर्माण संस्था म.,लातूरच्या १ ते २० सभासद-पदाधिकार्यांना आपल्या कार्यालयातील चौकशी अधिकार्यांनी दि.२५ मार्च २०२५ च्या नोटीसीने चेअरमन/सचिव व संचालक निवडीसंदर्भात मागविलेली खुलासावजा मागितलेली माहिती प्रकरणी माहितीच्या अधिकारात माहिती दि.१८ जून २०२५ रोजी मागितली,तेव्हा त्यांना संबंधितांनी काही दिवसांनी प्रथम मोबाईलवरुन माहिती घेवून जाण्यास सांगितले.तिथे अर्जदार गेले असता,पुन्हा येण्यास सांगितले.पुन्हा मोबाईलवरुन आजच माहिती घेवून जाण्यास सांगितले.गेले तेव्हा बँकेत पैसे चालनाने पैसे भरा असे पत्र देवून चलनावर साहेबांची सही घेवू,उद्या येण्यास सांगितले गेले.पैसे भरल्याची पावती नाही दिली दोन दिवसांनी गेले तेव्हा त्यांनी दिलेल्या पत्राप्रमाणे ३१६ रुपये रोखीने झेरॉक्ससाठी मागण्यात आले चिल्लर नसल्याने अर्जदाराने पाचशेची नोट दिली तेव्हा उद्या येण्यास सांगितले.दोन दिवसांनी गेले,तेव्हा १८४ बाकीतून शिपायाने १०० रुपये हातावर टेकविले.तर उर्वरित ८४ रुपये दि.२५ जुलै रोजी सायंकाळी देण्यात आले पावती नाही.दरम्यानच्या या काळात संबंधित कर्मचार्यांची या कामासाठी विषयीची अनास्था आणि लोकसेवक असल्याचे भान नसल्याचे,एकमेकांत सुसंवाद नसल्याचे,लोकांशी सौजन्याचे वागण्याचे चित्र दिसले नाही तर खाजगी दुकानातून कारभार चालवतोय असे दिसून आले.या कामातून जणू काही हाताला लागत नाही,नागरिक उगीच अर्ज फाटे करतात अशी भावना दिसतेय.माहितीचा अधिकाराविषयी अधिक माहिती नसल्याचेही दिसून आले.

अर्धवट,अस्पष्ट,संबंध नसलेली पाने

एकदाची प्रत्यक्षात माहिती अर्जदारांने हस्तगत केली असता,त्यात जागोजागी बेजबाबदारपणा दिसून आला.संबंधित जन माहिती अधिकार्यांनी दिलेली ही माहिती प्रत्यक्षात १६० पानांची असताना ती १५८ पाने पत्रात नमुद केली आहे. यातील अनेक पाने अस्पष्ट,अर्धवट आहेत,यातील कुठल्याही पानावर नंबर टाकण्यात आलेला नाही.काही पाने तर या विषयाशी वा माहिती संबंधितच नाही ती का घुसडण्यात आली ते कळले नाही.

पानांवर नंबरच नाहीत

ज्या कार्यालयाने ही शासकीय माहिती अर्जदाराला दिली,त्या प्रत्येक पानांवर नंबर टाकणे आवश्यक आहे,तो कुठेच नाही,त्यामुळे ती माहिती किती पाने आहे हे कशावरुन सिध्द होणार? कार्यालयाचा शिक्काच नाही जी माहिती दिली त्यावर माहितीच्या अधिकाराखाली दिलेली माहिती म्हणून शिक्काच उमटवलेला दिसत नाही, त्यामुळे या कार्यालयाने ही माहिती दिली आहे,हे कसे कळणार? कव्हरींगमध्ये किती पाने उल्लेख नाही

अर्जदारांना माहिती देताना जे कव्हरिंग लावले त्यात किती पानांची माहिती आहे याचा उल्लेख करणे आवश्यक असताना तो कशामुळे टाळला गेला हे समजायला मार्ग नाही. लातूर सहाय्यक निबंधक या कार्यालयातील काही लोकसेवकांच्या या एकूणच बेजबाबदार अशा कार्यपध्दतीमुळे माहिती अधिकारात,अर्जदाराला मिळालेली माहिती या कार्यालयाची असल्याचे स्पष्टच होत नाही,ती अर्धवट,असमाधानकारक,दिशाभूल करणारी असल्याने अर्जदार होळीकर यांनी दि.२१ जुलै २०२५ रोजी सहाय्यक निबंधक यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.त्यात याला जबादार कर्मचार्यावर उचित कारवाईची मागणी केली असून,त्यांची सुनावणी दि.२९ जुलै रोजी होणार आहे.

## बालरंगभूमी परिषदेतर्फे साजरा होणार बालकलाकारांचा हक्काचा दिवस

### २ ऑगस्ट 'मराठी बालनाट्य दिवस' निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी :- संपूर्ण भारतामध्ये मराठी बालरंगभूमीची समृध्द परंपरा असून, मराठी बालनाट्यालाही ६६ वर्षांची समृध्द परंपरा लाभली आहे. मराठी बालनाट्यांचे सर्वात जास्त प्रयोग महाराष्ट्रात होत असतात. २ ऑगस्ट १९५९ रोजी पहिल्या व्यावसायिक बालनाट्याचा प्रयोग झाला म्हणून बालरंगभूमी परिषदेतर्फे २ ऑगस्ट हा 'मराठी बालनाट्य दिवस' म्हणून साजरा करणार असल्याची माहिती बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या अध्यक्षा सुमती बिडवे सोमवंशी यांनी दिली आहे. बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न संस्था असून, या संस्थेतर्फे महाराष्ट्रातील सर्व शाखांमध्ये मराठी बालनाट्य दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. मराठी बालनाट्य दिवसानिमित्त बालरंगभूमी परिषद लातूर शाखेतर्फे एकपात्री अभिनय, वेशभूषा, नाट्यछटा या उपक्रमांचे आयोजन केले असून, या उपक्रमाला शहरातील बालकलावंत, पालक, शिक्षक व बालप्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे पदाधिकारी नवलाजी जाधव, मयूर राजापूरे, रणजित आचार्य, रवी अघाव, हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, वनिता गोजमगुंडे, तेजश्री घवले, हिरा रविकिरण सावंत, प्रिती ठाकूर, भिम दुनगावे, शरीफ पठाण, आकाश वाटवडे व सदस्यांनी केले आहे.

का साजरा केला जातो मराठी बालनाट्य दिवस

रत्नाकर मतकरी लिखित व सुधा करमरकर दिग्दर्शित 'मधुमंजिरी' या बालनाट्याचा पहिला प्रयोग २ ऑगस्ट १९५९ रोजी झाला होता. इथूनच मराठी रंगभूमीवर बालनाट्याच्या पर्वाला सुरुवात झाली. रत्नाकर मतकरींप्रमाणेच सुधा करमरकर यांचेही 'मधुमंजिरी' हे पहिलेच बालनाट्य होते. तिकीट विक्री करून साहित्य संघात झालेले ते पहिले व्यावसायिक बालनाट्य होते. या नाटकाच्या निमित्ताने सुधा करमरकर यांच्या लिटिल थिएटर या संस्थेचीही स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे मराठी रंगभूमीवरील पहिले बालनाट्य, या बालनाट्याचा पहिला व्यावसायिक प्रयोग आणि लिटिल थिएटर या संस्थेची स्थापना या त्रिवेणी योगावर शिक्कामोर्तब करत बालरंगभूमी परिषदेकडून २ ऑगस्ट हा दिवस 'मराठी बालनाट्य दिवस' म्हणून जाहीर करण्यात येवून, विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकलाकारांच्या हक्काचा दिवस म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो.

## लातूर जिल्ह्यातून चोरी केलेल्या ०७ मोटारसायकलीसह नांदेड मधील आरोपीला अटक.०३ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.

लातूर :- लातूर जिल्ह्यातून चोरी केलेल्या ०७ मोटारसायकलीसह नांदेड मधील आरोपीला अटक.०३ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २४/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला काही दिवसापूर्वी पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीतील मोटार सायकल चोरणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिद्धेश्वर मंदिराच्या पाठीमागील रिंग रोड वरून नांदेड येथील रहिवासी असलेल्या एका तरुणाला मोटरसायकलसह ताब्यात घेतले. त्यांच्या कडील मोटारसायकल संदर्भाने विचारपूस केली असता त्याने त्यांचे नाव इरबा उर्फ संभा पंढरीनाथ शिकारी, वय २८ वर्ष राहणार लादगा, तालुका मुखेड जिल्हा नांदेड.



असे असल्याचे सांगून मागील काही दिवसापासून त्याने लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दी मधून मोटार सायकली चोरी केल्याचे सांगितले. नमूद आरोपीच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीच्या सात मोटारसायकली एकूण किंमत ०३ लाख ९५ हजार रुपयाच्या मोटरसायकली जप्त करण्यात आल्या. यामध्ये पोलीस ठाणे शिवाजीनगर एमआयडीसी व गांधी चौक येथील मोटार सायकल चोरीचा प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले असून उर्वरित मोटरसायकल संदर्भाने तपास सुरू आहे. गुन्ह्याचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार युवराज गिरी प्रदीप स्वामी, राजेश कंचे, सिद्धेश्वर मदने,जमीर शेख, राहुल कांबळे गणेश साठे,काका बोचरे यांनी पार पाडली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE